


राणी बाग फेरफटक्यात पेंग्विन पाहा फ्री

पान ४ वर...

शनिवार, १ एप्रिल २०१७

पुण्य नगरी

Smart Mumbai



डेब्रिज कंत्राटात पुन्हा घोटाळा?

पान ४ वर...

HighLights



## श्रीम ह्युंदेईतर्फे फ्री कार क्लिनिक कॅम्पचे आयोजन

**मुंबई** : रे रोड येथील श्रीम ह्युंदेई (श्रीम मोटर्स प्रा. लि.)च्या वतीने १० दिवसांसाठी फ्री कार क्लिनिक कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. या कॅम्पचे उद्घाटन बुधवार, २८ मार्च रोजी करण्यात आले. शिवडी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शशिकांत धने यांच्याहस्ते या कॅम्पचे अनावरण करण्यात आले. या वेळी श्रीम मोटर्स प्रा.लि.चे जनरल मॅनेजर सतीश मुंदर्गी तसेच वर्कशॉपचे कर्मचारी वर्ग उपस्थित होता. २८ मार्चपासून सुरू झालेला फ्री कार क्लिनिक कॅम्प ८ एप्रिल २०१७ पर्यंत सुरू राहणार आहे. गाडीच्या विविध ९० चेकअप पॉइंटची तपासणी या वेळी करण्यात येणार आहे. दरम्यान, ग्राहकांना मागणीनुसार आकर्षक डिस्काऊंटचा लाभ मिळणार आहे. यात गाडीच्या सुट्या भागांवर भरघोस सूट, लेबर चार्जवर आकर्षक सवलत आणि फ्री कार वॉश देखील केली जाणार आहे. जास्तीत जास्त वाहन ग्राहकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीम मोटर्स प्रा. लि.च्या वतीने करण्यात आले आहे.

## ‘एक होती माळीण’च्या चित्रीकरणाला सुरुवात

**मुंबई** : ड्रीम क्रीएशनची निर्मिती असणारा ‘एक होती माळीण’ या चित्रपटाच्या चित्रीकरणाला लवकरच सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती पत्रकार संघ येथे शुक्रवारी निर्माते रोशन शेंगे यांनी दिली. या वेळी अभिनेते प्रशांत कासारे, दिग्दर्शक राजू राणे व दत्ता गायकार, भूषण करंदीकर आदी मान्यवर उपस्थित होते. पुणे, आंबेगाव जवळ ३० जुलै २०१४ ला माळीण गावावर दरड कोसळून १५१ रहिवाशांचा जीव गेला होता. २ एप्रिला मुख्यमंत्री नव्या वसाहतीत या गावाचे पुनर्वसन कार्यक्रमाच्या वेळी घरांच्या चाव्या देणार आहे. आजही या रहिवाशांना त्या आठवणी झाल्या की, या नव्या घराचे काही कौतुक वाटत नाही, कारण आपली माणसं या नव्या घरात नसणार. अशा या माळीण गावावर आता लवकरच चित्रपट तयार होत आहे. या चित्रपटात तंत्रज्ञानाचा एक आगळा वेगळा प्रयोग करण्यात आला आहे, असे शेंगे यांनी सांगितले.

## महात्मा जोतिराव फुले यांचे स्मारक व्हावे

**मुंबई** : क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले व सावित्रीमाई फुले यांचे पुण्यातील ऐतिहासिक भिडे वाड्यात स्मारक व्हावे, अशी मागणी हनुमान नगर, कांदिवली (पू.) येथील उन्नती महिला बचत गटाच्या अध्यक्षा कवयित्री, सामाजिक कार्यकर्त्या अरुणा भागचंद्र जाधव यांनी केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांची भेट घेत एका निवेदनाद्वारे केली आहे. महात्मा फुले यांनी बुधवार पेठ, पुणे येथील भिडे वाड्यात १ जानेवारी १८४८ रोजी मुलींची पहिली शाळा सुरू करून स्त्रियांना ज्ञान व शिक्षण देण्याचे महान कार्य सुरू केले. त्यांचे याच भिडे वाड्यात स्मारक व्हावे, तसेच महात्मा जोतिराव फुले व सावित्रीमाई फुले या महान समाज सुधारकांना ‘भारतरत्न’ किताब देण्यात यावा, अशी मागणीही त्यांनी या निवदेनातून केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांच्याकडे केली आहे.

## मुंबई विद्यापीठामध्ये भारत–इस्राईल अभ्यासकेंद्राची स्थापना

**मुंबई** : मुंबई विद्यापीठामध्ये ‘गेट वे हाऊस’च्या वतीने भारत आणि इस्रायली शिक्षणप्रेमींसाठी एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रामध्ये भारत आणि इस्रायलमधील मीडिया, जनसंपर्क यांची भागीदारी आणि शिक्षणसंस्थांचे महत्त्व याबाबत विचार करण्यात आला. या चर्चासत्राचे फलित म्हणजे मुंबई विद्यापीठामध्ये भारत-इस्राईल अभ्यासकेंद्राची स्थापना करण्यात आली आहे. हे नवीन अभ्यासक्रम मुंबई विद्यापीठ आणि इस्राईलमधील तेल अवील विद्यापीठाशी जोडण्यात आले आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आगामी जून-जुलै महिन्यांत इस्राईलच्या दौऱ्यावर जाणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर या अभ्यासकेंला महत्त्व आले आहे. ‘गेट वे हाऊस’चे कार्यकारी संचालक मनजीत कृपलानी या वेळी म्हणाल्या, शिक्षणक्षेत्रामध्ये आता ‘थिंक टँक’ची भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण आहे. केवळ शिक्षणक्षेत्राशी जोडल्या गेलेल्या ‘थिंक टँक’ची मक्तेदारी आता संपुष्टात येईल. शिक्षणक्षेत्रामधून बाहेर येणारे स्कॉलर्स आता देश तसेच विदेशामधील विविध शासकीय यंत्रणांच्या नियोजनामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका निभावू शकणार आहेत.

# बेस्टच्या कर्मचाऱ्यांना पगार उशिराच

मार्च महिन्याचे वेतन एप्रिलच्या १२ तारखेनंतरच

**मुंबई** : दिवसेंदिवस आर्थिक तोट्याचा आकडा वाढणाऱ्या बेस्टला आर्थिक मदत करण्यासाठी महानगरपालिका तयार आहे. त्यासाठी बेस्ट प्रशासनाचा ॲक्शन प्लान पालिकेला सादर करण्यात आलेला आहे. त्यावर चर्चा होणार असून मार्च महिन्याचा पगार कर्मचाऱ्यांना एप्रिल महिन्याच्या १२ तारखेनंतरच देऊ शकू, अशी स्पष्ट कबुली बेस्टचे महाव्यवस्थापक डॉ. जगदीश पाटील यांनी शुक्रवारी दिली. शुक्रवारी बेस्ट समितीची बैठक होती. या बैठकीनंतर पत्रकारांशी महाव्यवस्थापक आणि बेस्ट समितीचे अध्यक्ष अनिल कोकीळ यांनी चर्चा केली.

बेस्ट ही महापालिकेअंतर्गत असली तरी बेस्टला महापालिकेच्या यंदाच्या अर्थसंकल्पात भरीव निधी देण्यात आला नसल्याचा हरकतीचा मुद्दा भाजपाचे सदस्य सुनील गणाचार्य यांनी मांडला. बेस्टच्या विद्युत विभागावर परिवहन विभाग चालवण्यात येत होता. त्यामुळे महापालिकेने बेस्टला आर्थिक मदत करणे आवश्यक असल्याचे मत गणाचार्य यांनी मांडले. या मुद्द्याला समर्थन देत अतुल शहा आणि अनिल पाटणकर यांनीदेखील महापालिकेने मदत करण्याची आवश्यकता असल्याचे मत मांडले. महापालिका मदत करण्यास तयार आहे; परंतु बेस्टची आर्थिक स्थिती बिघडण्यासाठी बेस्टचे अधिकारीच जबाबदार असल्याचे मत काँग्रेसचे रविराजा यांनी व्यक्त केले. महापालिका आयुक्तांनी बेस्टला आर्थिक मदत करण्यास सकारात्मक भूमिका घेतली असून बेस्टला त्यासाठी आपला ॲक्शन प्लान तयार करण्यास सांगितले असल्याचेदेखील रविराजा यांनी सांगितले. महापालिका निधी देते; परंतु प्रशासन त्याचे योग्य नियोजन करत नसल्याचा आरोपदेखील रविराजा यांनी केला. एसी बसेस चालवण्याचा प्रशासनाचा निर्णय चुकीचा असल्याचे देखील त्यांनी सांगितले. एसी बसच्या देखभाल-दुरुस्तीसाठी वर्षाला ८२ कोटी रुपयांचा खर्च होतो. त्यामुळे एसी बंद करण्याची मागणी रविराजा यांनी केली. यावर उत्तर देताना बेस्टचे महाव्यवस्थापक डॉ. जगदीश पाटील यांनी महापालिकेला ॲक्शन प्लान सादर केला असल्याचे सांगितले. मार्च महिन्याचा पगार कर्मचाऱ्यांना एप्रिल महिन्याच्या १२ तारखेनंतरच देऊ शकू, असे स्पष्ट महाव्यवस्थापकांनी सांगितले.

### तोटा कमी करण्यासाठी भाडेतत्त्वावर बसेस आवश्यक

नवीन बसेस विकत घेण्यासाठी आर्थिक निधी नसल्यामुळे बसेसची संख्या आहे तीच कायम ठेवण्यासाठी भाडेतत्त्वावर बसेस घेणे आवश्यक आहे. ५० बसेस भाडेतत्त्वावर घेण्यात येणार आहे. हा प्रस्ताव पुढील वर्षासाठी असल्याचे महाव्यवस्थापकांनी सांगितले. ३०० नवीन बसेसपैकी ४६ बसेस बेस्टच्या ताफ्यात आलेल्या आहेत.

# भांडुपच्या वाहतूक कोंडीवर रस्ता रुंदीकरणाचा उपाय





**मुंबई** : गेली अनेक वर्षे भांडुपकरांना त्रासदायक ठरत असलेल्या वाहतूक कोंडीवर पालिकेने उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. गुरवार, ३० मार्च रोजी पालिकेने भांडुप (प.), लाल बहादूर शास्त्री मार्गावरील सोनापूर सिग्नल आणि हिंदू स्मशानभूमी समोरील रस्ता रुंदीकरणात येणाऱ्या सहा दुकानांवर निष्कासनाची कारवाई केली. तर शुक्रवार, ३१ मार्च रोजी लाल बहादूर शास्त्री मार्गाला टेंबीपाडा विभागाशी जोडणाऱ्या टँक रोडवरील रुंदीकरणाच्या कामात अडथळा ठरणारी पाच दुकाने हटवण्यात आली आहेत.

भांडुप विभागात दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात लोक संख्या वाढत आहे. भांडुपची मोठी लोकवस्ती ही टेंबीपाडा या विभागात राहते. यामुळे मुंबईतील बेस्ट बसला सर्वात जास्त नफा देणारा मार्ग म्हणून भांडुप टेंभीपाडा मार्ग ओळखला जातो; परंतु या रस्त्यावर काही ठिकाणी दुकाने अगदी रस्त्याच्या लगत आल्याने भांडुपकरांना आणि महत्त्वाचे म्हणजे बेस्ट बसचालकांना येथे वाहूतक कोंडीला सामोरे जावे लागत होते. याबाबत भाजपाचे ईशान्य मुंबई विभागाचे महामंत्री जितेंद्र घाडीगावकर यांनी पालिकेचे आयुक्त आणि सहाय्यक आयुक्त यांच्याकडे या रस्त्यांवरील रुंदीकरणाच्या मध्ये येणारी दुकाने आणि झोपड्या हटवून त्यांचे पुनर्वसन करून हे रस्ते रुंद करण्याची मागणी केली होती. पालिकेने यावर कारवाई करत भांडुपमधील टँक रोड, जंगल मंगल रोड, जनता मार्केट रोड, भक्तीपाडा रोड, मुरुम खडा रोड, पवई आयआयटीला भांडुपला जोडणारा आणि लाल बहादूर शास्त्री मार्गाला पर्यायी असलेल्या नव्वद फूट रोड इत्यादी रस्त्यांवर असलेले अडथळेही पालिका लवकरच हटवणार असून यातील काहींचे नाहूर जवळ पुनर्वसन करण्यात येत आहे. भांडुपमध्ये गेले अनेक दिवस नागरिकांनी वारंवार मांडलेली वाहतूक कोंडीची समस्या या रस्ता रुंदीकरण कारवाईमुळे काही प्रमाणात नक्की सुटेल, अशी आशा भांडुपकर व्यक्त करत आहेत.

## यंदाचा पालिका अर्थसंकल्प विकासकामांवर परिणाम करणारा

**मुंबई** : मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प वास्तववादी व पारदर्शी नसून मुंबईकरांची दिशाभूल व विकासकामांवर परिणाम करणारा असल्याचा आरोप मनसेचे माजी नगरसेवक संदीप देशपांडे यांनी केला आहे. पारदर्शकतेचे पहारेकरी गेटवर खुर्च्या टाकून झोपले आहेत, अशी टीकाही त्यांनी केली.

यंदाचा पालिकेचा अर्थसंकल्प ११ हजार कोटींनी कमी केला आहे. खर्च कमी केला, मात्र कर तसाच आहे. कपात केल्याने त्याचा विकासकामांवर परिणाम होणार असल्याचे देशपांडे यांनी म्हटले आहे. जकात कर जाणार असल्याने त्याचे मिळणारे उत्पन्न प्रशासनाला भरून काढायचे आहे. त्यामुळे हा आकड्यांचा खेळ आहे. जकात कर रद्द झाल्यानंतर केंद्र सरकार किती पैसे व कधी देणार आहे, याबाबत काहीही माहिती नाही, याबाबत आयुक्तच साशंक आहेत. जकात चुकवणाऱ्यांवर आतापर्यंत काहीही कारवाई झाली नाही, ही जबाबदारी कोण घेणार? असा सवालही त्यांनी विचारला. मागील वर्षी मालमत्ता कर जास्त मिळाला, मग या वेळी कमी का? प्रशासनाचा हा नाकर्तेपणा आहे. निवडणुकीपूर्वी शिवसेनेने मालमत्ता कर व भाजपाने खड्डेमुक्त मुंबई होईपर्यंत रस्ते टॅक्स माफ करण्याचे आश्वासन दिले होते, त्याचा अर्थसंकल्पात उल्लेखच नाही. या दोन्ही गोष्टींचा राज्य सरकारशी संबंध येतो. तरीही आश्वासन देऊन या दोन्ही पक्षांनी मुंबईकरांची दिशाभूल केली आहे. त्यामुळे पारदर्शी व वास्तवदर्शीही अर्थसंकल्प वाटत नाही. केवळ अपयशावर पांघरून घालण्यासाठी हा आकड्यांचा खेळ आहे. खर्च कमी करून विकासकामांत कपात केली आहे. फसवणाऱ्या गोष्टींनी भरलेले बजेट असल्याची जोरदार टीका देशपांडे यांनी या वेळी केली. शिक्षण, रस्ते, आरोग्य यासाठी काहीही वेगळी तरतूद अर्थसंकल्पात नाही. कामगार कपात करून कंत्राट पद्धत लागू करण्याचा डाव आहे. भाजपाच्या काही नेत्यांकडे ही योजना राबवली जाते, त्याला प्रोजेक्ट करण्यासाठी तर कामगार कपात नाही ना? असा सवालही त्यांनी विचारला. खर्च कमी करण्यासाठी कामगार कपात का, मग अधिकाऱ्यांचे चोचले कशासाठी? त्यांनाही चार जास्त कामांची जबाबदारी द्या. त्यांच्या वाहनांवर खूप खर्च येतो, त्यामुळे त्यांची वाहने काढून घ्या, अधिकाऱ्यांच्या इतर गरजेच्या नसलेल्या पोस्ट कमी करा, फक्त कामगार कपातच कशासाठी? कामगारांना वेगळा न्याय देण्यात आला आहे, मनसे अशा चुकीच्या गोष्टींना तीव्र विरोध करेल, असे ते म्हणाले. उपयोगिता सेवांमुळे (युटीलिटीज) रस्त्यावर खड्डे पडतात, याबाबत अर्थसंकल्पात काही उल्लेख नाही. ७२/३ नियमांत पारदर्शीपणा आणण्याचा प्रयत्न केला आहे.



## दहिसर येथे पोलिसांना धक्काबुकी

**मुंबई** : वाढदिवस साजरा करण्यासाठी वीजचोरी तसेच ध्वनिप्रदूषण कायद्याचे उल्लंघन होत असल्याच्या माहितीवरून घटनास्थळी दाखल झालेल्या पोलिसांना धक्काबुक्की करण्याचा प्रकार दहिसर येथे घडला आहे. या प्रकरणी पोलिसांनी १३ जणांना अटक केली असून याचा अधिक तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. दहिसर पूर्वेकडील अंबावाडी परिसरात डी. एन. दुबे रोडच्या मशिदीजवळ हा प्रकार घडला. सेलोट नामक व्यक्तीसह एकूण १३ जणांना पोलिसांनी अटक केली आहे. सेलोटच्या वाढदिवसासाठी आकडा टाकून घटनास्थळी रोषणाई करण्यात आली होती. त्यानंतर रात्री उशिरापर्यंत मोठ्या आवाजात डीजे वाजवला जात होता. तसेच फटाकेही फोडले जात होते. यामुळे येथील नागरिकांनी पोलीस नियंत्रण कक्षाला फोन करत, याची तक्रार केली होती. त्यानुसार, दहिसर पोलिसांना याची माहिती मिळताच त्यांनी तेथे धाव घेतली. मात्र या ठिकाणी मद्यधुंद अवस्थेत असलेल्या जमावाने पोलिसांना धक्काबुकी करण्यास सुरुवात केली. अशावेळी अधिक कुमक घटनास्थळी मागवून १३ जणांना अटक करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

# घाटकोपरमध्ये बाळासाहेब ठाकरे चौकाच्या नामफलकात चूक




**मुंबई** : मुंबई महानगरपालिकेत शिवसेनेची सत्ता असली तरी पालिकेच्या कारभाराने खुद्द स्वर्गवासी बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचे स्पेलिंगच पालिका अधिकाऱ्यांना येत नसल्याचे समोर आले आहे.

दोन दिवसांपूर्वी घाटकोपर येथील भटवाडी, साकीनाका, घाटकोपर स्थानक आणि पारशीवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यांना जांभळीपाडा येथे जोडणाऱ्या चौकाचे श्री बाळासाहेब ठाकरे चौक, असे नामकरण करण्यात आले. याचे फलक देखील पालिकेने या चौकात लावले. अगदी शिवसेना शाखेसमोर देखील हे फलक लावण्यात आले. या फलकावरील बाळासाहेब ठाकरे यांचे मराठीतील नाव बरोबर असले तरी इंग्रजीमधील त्यांच्या नावाचे स्पेलिंग **SHRI BALASAHEB THAKARE CHAOWK** असे लिहिले असून खरे तर ठाकरे या नावाचे स्पेलिंग **THACKERAY** असे असल्याचे काही शिवसैनिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे हे संपूर्ण नाव बदलून या चौकाला ‘हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे’ असे देण्यात यावे आणि या नावात दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी नगरसेवक किरण लांडगे यांनी पालिका एन विभागाला पत्र लिहून केली आहे. याबाबत पालिका विविध अधिकाऱ्यांना फोनवरून संपर्क करण्याचा प्रयत्न केला; परंतु तो होऊ शकला नाही.

# हायकोर्टाच्या आदेशानंतर फेरीवाल्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

हॉकर्स युनियनचे नेतेही आक्रमक

**जयवंत बामणे**

**मुंबई : फूटपाथवर अतिक्रमण करून फेरीवाले आपल्या पथाऱ्या मांडतात आणि रस्ते अडवून लोकांना त्रास देतात. पालिका त्यांच्यावर कारवाई करून त्या वारंवार हटवत असली तरी ते पुन्हा त्याच ठिकाणी आपले बस्तान मांडतात. फेरीवाल्यांच्या या नित्यनेमाच्या समस्येवर प्रभावी तोडगा काढा, असा आदेश हायकोर्टाने दिला आहे. त्यानंतर फेरीवाल्यांनी टाहो फोडत ‘आमचे पुर्नवसन करा,’ अशी मागणी केली आहे. फेरीवाल्यांनी युनियन नेत्यांच्या गाठीभेटी घेऊन या प्रश्नावर सरकारने काय तो मार्ग काढावा, असे मत व्यक्त केले आहे. हायकोर्टाच्या आदेशामुळे फेरीवाल्यांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.**

अंधेरी येथील फेरीवाल्यांच्या विळख्यामुळे फूटपाथवरून चालणेही मुश्कील झाले असून त्यामुळे वाहतूक कोंडी होते. लोकांना त्रास सहन करावा लागत असल्याने नौशेरवान मोहम्मद युसूफ यांनी हायकोर्टात जनहित याचिका दाखल केली होती. त्याची सुनावणी झाली. हायकोर्टाने यासंदर्भात पालिकेला पुढील तारखेपर्यंत प्रभावी तोडगा काढा असा, आदेश दिला आहे. त्यानंतर फेरीवाल्यांनी रान उठवून यासंदर्भात टाहो फोडला. पालिकेने आमचे पुर्नवसन करावे व आम्हाला पर्यायी जागा द्यावी, असे मत अनेक फेरीवाल्यांनी व्यक्त करून त्यांनी फेरीवाला नेत्यांची भेट घेऊन आमच्या प्रश्नासाठी काही तरी करा, अशी मागणी केली आहे.

दरम्यान, रिपब्लिकन फेरीवाले नेते हरिहर यादव यांनी याबाबत, आम्ही फेरीवाल्यांच्या प्रश्नासाठी गेल्या अनेक वर्षांपासून आंदोलन करत असून हा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात आहे. त्यांनी देखील फेरीवाल्यांच्या प्रश्नावर पालिकेने तोडगा काढावा, असा आदेश दिला आहे; पण पालिका याबाबत काही मार्ग काढत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. फेरीवाले व्यवसाय करून आपला चरितार्थ चालवत आहेत. ते काही चोरी करत नाहीत. असे असताना त्यांना पालिकेने रीतसर जागा देऊन रोजगार मिळवण्याची मुभा द्यावी, यासाठी पाहिजे तर पालिकेने त्यांच्याकडून अल्प शुल्क आकारावे, असे यादव म्हणाले. आम्ही जी आंदोलने केली आहेत त्याचा परिणाम हा तात्पुरता होत असून पालिका नंतर मौन धारण करत आहे. मानवतेच्या दृष्टिकोनातून या फेरीवाल्यांचा विचार व्हावा, असे ते शेवटी म्हणाले. फेरीवाल्यांना पालिकेने वेगळा झोन करून त्यात त्यांचे पुनर्वसन करावे, असे मत ओमप्रकाश सिंह यांनी व्यक्त केले. योगेश मिश्रा यांनी फेरीवाल्यांनी फूटपाथ न अडवता आपला व्यवसाय एका साईडला करावा, असे मत मांडले.

निवृत्त पोलीस अंमलदार विश्‍ननाथ धोंडू तावडे यांनी आपले मत मांडताना सांगितले की, सरकारने त्यांचा वेगळा हॉकर्स झोन करून द्यावा जेणेकरून ते आपला व्यवसाय करून त्यावर उदरनिर्वाह करतील. फेरीवाले देखील आम्हाला जर पालिकेने शुल्क आकारून जागा दिल्या तर आम्ही त्यास तयार आहोत, असे सांगितले. कांदिवली स्टेशन बाहेर व्यवसाय करणारा गामा यादव म्हणाला, आमचे आयुष्य फेरीवाल्याचा व्यवसाय करण्यात गेले. आमची मुले शिकत आहेत. जर आम्ही मेहनत करून त्यांना शिकवत असू तर सरकारने आम्हाला प्रोत्साहन देण्याऐवजी आमच्याशी दुर्व्यवहार का करावा? असा प्रश्न त्याने विचारला. पालिका अधिकाऱ्यांच्या जाचाला आम्ही कंटाळलो आहोत. आता कोर्टानेच दखल घेतली आहे तर पालिकेने पाऊल उचलून यावर प्रभावी तोडगा काढावा, असे यादव म्हणाला.



# बनावट कागदपत्रे तयार करणाऱ्यांना अटक

**मुंबई** : ॲण्टॉप हिल येथील सीबीएम शाळेत सरकारी सवलतींचा फायदा उठवण्यासाठी बनावट कागदपत्रे पालकांनी जमा केल्याचे उघड झाले होते. याप्रकरणी ॲण्टॉप हिल पोलिसांनी २३ मार्च रोजी कारवाई करून ८ जणांना अटक केली होती.


आता या प्रकरणात आणखी दोघा पालिका कर्मचाऱ्यांसह एका दलालास अटक केली आहे. शैलेश जानकार (३७) हा केईएम रुग्णालयात आरोग्य विभागात कारकून आहे. तसेच रामदास जाधव (३५) गोवंडी एम/पूर्व वॉर्ड ऑफिसमध्ये शिपाई म्हणून काम करतो, तर प्रकाश कदम (४०) हा दलाल म्हणून काम करतो. या तिघांना अटक केली असून याचा अधिक तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. या तिघांनी पालकांना बनावट जन्माचे दाखले काढून दिल्याचे तपासात समोर आल्यानंतर या तिघांना अटक करण्यात आल्याच ॲण्टॉप हिल पोलिसांनी सांगितले. सीबीएम शाळेच्या पहिलीतील प्रवेशादरम्यान मोठ्या संख्येने आरटीआयअंतर्गत अर्ज दाखला करण्यात आले होते. या अर्जांची पडताळणी केली असता यातील काही अर्जाच्या तारखा या सारख्याच असल्याचे शाळेच्या मुख्याध्यापिका रिबेका शिंदे यांच्या लक्षात आले. या प्रकरणी त्यांनी अधिक तपास केला असता या मुलांचे जन्माचे दाखले बनावट असल्याचे समोर आले. त्यानुसार, त्यांनी यातील दोषींविरोधात ॲण्टॉप हिल पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.

Residential Complex in Fastest Growing City at PALGHAR




Oswal Dream City
Palghar (W)

Ready Possession Flats




Oswal Lifespaces
Palghar (E)

Flats Under Construction

Amenities

- Lift Facility
- Collector Approved Plan
- Garden, Temple, School, Shopping Centre & Club House within Complex
- Pick up - Drop Facility Available
- Housing Loan Available

Pradhan Mantri Awaas Yojna Benefit Available*

* T & C Apply

For Booking Contact:
77108 77777 / 77109 77777